# पुस्तकी वांझ चर्चा

(एकटाकी नाटक)

दत्ता भगत

सर्वांचे सुखी जीवन हेच माझे जीवन
इसाप प्रकाशन, नांदेड

प्रकाशन क्रमांक ५५०

**पुस्तकी वांझ चर्चा (नाटक)**

Pustki Wanzh Charcha

**दत्ता भगत**

मो : ९८८१२३००८४

प्रथम आवृत्ती :
**८ डिसेंबर २०१९**

सर्वहक्क :
**सौ. सुमन भगत**
२७, मिरजगावेनगरी
बीड बायपास रोड, औरंगाबाद

प्रकाशक :
**दत्ता डांगे**
इसाप प्रकाशन,
‘कांचनब्रह्म’
१९०, सहयोगनगर
नांदेड - ४३१ ६०५
भ्र. ९८९००९९५४१

मुखपृष्ठ
**प्रमोद दिवेकर**

अक्षरजुळणी :
**कृष्णा डीटीपी आर्ट, नांदेड**
भ्र. ०९५४५३५१८२०

मुद्रितशोधक
**शर्मिष्ठा भगत**

मुद्रक :
**मधुराज पब्लिकेशन्स प्रा.लि. धायरी पुणे**

मूल्य : **१०० रुपये**

अत्यंत संवेदनशील मनाचे
डॉ. गणेशराज सोनाळे
आणि
प्रेमळ स्वभावाच्या गया वहिनी
ह्या उभयताना...

– दत्ता भगत

# मनोगत

माझे मलाच आश्चर्य वाटावे असे हे माझे नाटक, मी एका बैठकीत लिहून काढले. ह्या नाटकाचा कुणीतरी प्रयोग करावा ह्यासाठी मी कुठलेच प्रयत्न केले नाहीत. निदान एखाद्या दिवाळी अंकात ते छापावे आणि वाचकांच्या प्रतिक्रियांचा अंदाज घ्यावा असेही कधी मला वाटले नाही. नाही म्हणायला फक्त एकदाच या नाटकाचे वाचन माझ्या निवडक मित्रांसमोर केले इतकेच. काही दिवसांपूर्वी मुंबई विद्यापीठात एका व्याख्यानाच्या निमित्ताने गेलो होतो. माझ्या आधी माझे दिल्ली येथील मित्र आणि प्रसिद्ध अभ्यासक डॉ. बजरंग बिहारी यांचे एक अभ्यासपूर्ण व्याख्यान झाले. त्या व्याख्यानानंतर प्रश्नोत्तरे झाली आणि त्या वांझ चर्चेने माझ्या मेंदूचा भुगा झाला. आणि मला आठवले, अशाच एका प्रसंगी अशीच वांझ चर्चा झाली होती. निमित्त फक्त वेगळे होते इतकेच. आणि ती वांझ चर्चा ऐकून मी माझी अस्वस्थता दूर करण्यासाठी अगदी एकटाकी नाटक लिहिले.

अनेक वेळेला चर्चा वांझ का ठरतात? कारण मूलतः बौद्धिक पातळीवर मनोरंजन व्हावे ही मानवी गरज असते म्हणून. उदाहरण सांगायचे तर एखादा कीर्तनकार रामायणातल्या प्रसंगावर कीर्तन करीत असला तरी 'एकपत्नीव्रत' ही आपण जीवनशैलीची गरज मानत नाही, म्हणून ते आपले एकप्रकारे मनोरंजनच असते. मद्यपानाचा निषेध पंचशीलात सांगितलेला असला तरी तो निषेध जीवनशैलीतून उगवलेला नसल्यामुळे त्यावरील चर्चाही आपले मनोरंजनच करीत असते. श्रद्धायुक्त विधीवरील चर्चाही अशीच वांझ असते. गेल्या तीस चाळीस वर्षांत अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे कार्य ५-१० पटीने वाढले आणि त्याचवेळी देवदेवळांचे उत्पन्नही पाचपन्नास पटीने वाढले. ही अंधश्रद्धा निर्मूलन चर्चाही मला बौद्धिक मनोरंजन वाटली तर ती माझी चूक आहे असेच मी समजायचे का? आयुष्यातले अंतर्विरोध कुणाला आवडोत अथवा न आवडोत ते शब्दबद्ध करण्याचा प्रत्येक लेखक, कवीला हक्क असतो, असे मला वाटते. तेव्हा हा नाटकरूपी उद्रेक माझ्या हक्काचा आविष्कार आहे. असे समजून मी इतके दिवस माझ्यापुरताच शिल्लक ठेवला होता. पण मुंबई विद्यापीठातील चर्चेनंतर माझी आणि माझे मित्र इसाप प्रकाशन संस्थेचे चालक दत्ता डांगे ह्यांची भेट झाली. चर्चेत सदर नाटकाचा मी उल्लेख केला आणि त्यांनीही नाटक पुस्तकरूपाने काढण्याची तयारी दर्शविली, मी त्यांचे आभार मानतो.

माझे मित्र डांगे स्वतः लेखक आहेत आणि नाटकाला 'एकटाकी नाटक' असं अर्थपूर्ण विशेषण बहाल केल. मला ते खूप आवडलं. त्यांचे मनापासून आभार. माझे मित्र दिवेकर ह्यांना माझे हे नाटक आवडले असेही कळवले आणि ह्या नाटकातील संघर्षाला सुसंगत असा रंग रेषेचा आकार दिला. त्यांचे मनापासून आभार. कृष्णा डीटीपी नांदेड आणि आयु. शर्मिष्ठाचे आभार. बाहेरच्या संघर्षा इतकेच आपल्या मनातील द्वंद्वे ज्यांना अस्वस्थ करतात अशा वाचकांच्या प्रतिसादाची वाट पहाण्यात मला धन्यता वाटेल.

आज सोनपेठ (जिल्हा परभणी) येथे सहावे बौद्ध साहित्य संमेलन आहे. योगायोगाने बौद्ध परिषदेचे सूत्रधार आणि अध्यक्ष माझे मित्र प्राचार्य डॉ. कमलाकर कांबळे ह्यांनी व त्यांच्या सर्व सहकाऱ्यांनी मला अध्यक्षपदाचा बहुमान दिला.

आजचा हा दिवस माझ्यासाठी एक स्मरण दिवस ठरला याचाही मला खूप आनंद होत आहे.

माझे मित्र गणेशराज सोनाळे ह्यांनी हिंदीतील प्रसिद्ध नाट्यलेखक डॉ. नरेंद्र मोहन यांच्या उपस्थितीत ह्या नाटकाच्या वाचनाचा योग घडवून आणला. त्याबद्दल त्यांचेही आभार मानतो आणि इथेच थांबतो.

**– दत्ता भगत**

**नांदेड**

# पुस्तकी वांझ चर्चा

## मुख्य पात्रे

लेखक

तो (त्याच्यातला बंधमुक्त)

ती (त्याची कल्पनाशक्ती)

आणि

पत्नी

# अंक पहिला

## प्रवेश पहिला

(रंगमंच उजळून निघतो. एका लेखकाच्या घरातील बाहेरची खोली. लेखक साठीत. लेखक दलित साहित्यिक असावा. याच्या काही खाणाखुणा. लेखक लिहीत बसलेला. मध्येच अडतो, अस्वस्थ होतो. कुणावर तरी चिडतो. त्याच्या त्या अवस्थेतच बाहेर काहीतरी पडल्याचा आवाज. लेखकाची तंद्री भंग पावते. तो उठतो. बाहेर जाऊन शोध घेतो. परत येत...)

**लेखक** : कुणीच नाही. (जागेवर येऊन बसतो.) भास होता, पण एकदम असं बाहेर कुणीतरी पडल्याचा आवाज आला. (दरम्यान एक गृहस्थ लेखकाच्या सावलीत येऊन बसतो. त्याची चाहूल लागून) भास नाही. नक्कीच कुणीतरी आहे. कोणंय? ('तो' फक्त लेखकाला दिसतो. रंगमंचावरील अन्य कुणालाही दिसत नाही असे इथे गृहित आहे.)

**तो** : कुठंय, कोण रे?

**लेखक** : तू?

**तो** : कोण येईल अशा अवेळी? तुझ्या या भूतबंगल्यात?

**लेखक** : का? तू आलासच की.

**तो** : मी गेलोच कुठं होतो? सारे दिवे मालवलेस आणि टेबललॅम्प तेवढा ठेवलास त्यामुळं मी तुला दिसेनासा झालो होतो, इतकंच. अंधारात मी दिसेनासा होतो, पण प्रकाश आला की लगेच कळतं, माझं अस्तित्व सर्वांना. निदान तुला, होय ना?

**लेखक** : पण मघाशी आवाज आला. एकदम कुणी तरी बाहेर पडल्याचा.

**तो** : लिहिता लिहिता तू अचानक थांबला होतास. आणि बराच अस्वस्थ झाला होतास. होय ना?

**लेखक** : हो.

**तो** : आणि मग अचानक उसळी मारून लिहावसं वाटलं तुला. होय की नाही?

**लेखक** : तर?

**तो** : आता एवढी उसळी मारून लिहिणार म्हटलं की आवाज होणारच ना?

**लेखक** : म्हणजे मला सुचलेल्या कल्पनेचा आवाज होता तो!

**तो** : तसं समज.

**लेखक** : की, तो तूच होतास?

**तो** : तसंही समजायला हरकत नाही.

**लेखक** : काय चालवलंयस तू?

**तो** : मी? मी काय चालवणार? मला आहेच कुठं स्वतंत्र अस्तित्व? जे काय चालवलंयस ते तू. खरं तर मीच हा प्रश्न तुला विचारायला हवा. काय चालवलंयस तू?

**लेखक** : मी? कुठं काय चालवलंय?

**तो** : ही तुझी निरवानिरवीची भाषा.

**लेखक** : उद्या सेवानिवृत्त होतोय ना? बेचाळीस वर्षाच्या सलग सेवेचा अखेरचा दिवस.

**तो** : सेवानिवृत्त होणारा जगात काय तूच एक आहेस?

**लेखक** : नाही. तसं नाही, पण वयाच्या सतराव्या वर्षी ही नरडेघाशी सुरू केली.

**तो** : खर्डेघाशी म्हणायचं का तुला?

**लेखक** : अरे, मी लेखक आहे. शब्द नाही चुकणार. खर्डेघाशी करायला मी काय कारकून थोडाच होतो? शिक्षक होतो ना!

**तो** : (काहीसा तुच्छतेनं) कासवगतीनं का होईना, पण विद्यापीठापर्यंत पोहोचलेला.

**लेखक** : कुठंही पोचू दे; पण नरडेघाशीच केलीय.